**प्रेस नोट** **दिनांक- ०६/०४/२०२६**

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०४, मुंबई.
भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई.

**''बोलबच्चन करुन दागिणे चोरणाऱ्या सराईत आरोपीस अटक केल्या बाबत..''**

दिनांक ३०/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा.च्या सुमारास फिर्यादी नामे श्री.जॉसेफ सी.ए. फर्नांडीस,७१ वर्षे हे गौरीशंकर मिठाईच्या दुकाना समोरुन पायी जाताना त्यांच्या जवळ दोन अनोळखी इसम आले. त्यातील एकाने मला "तु राजूचा भाऊ आहेस ना, तु मला ओळखत नाही का? चल चहा घेवू, तेव्हा दुसऱ्या साथीदाराने "हा मला ओळखत नाही. याला मी कोण आहे ते सांग, तेव्हा पहिल्या साथीदाराने, तुम्ही याला ओळखत नाहीत का? हा मोठा माणूस आहे. गौरीशंकर मिठाईचे दुकान सुध्दा त्याचेच आहे. अशा प्रकारे बोलबच्चन देवुन, त्यांचे हातातील पिशवी मधील साहित्य पडताळुन तेथे तक्रारदारांना त्यांचे गळयातील चैन त्यात ठेवू असे सांगून, त्यांचे गळयातील सोन्याची चैन काढली व ती ठेवल्याचे भासवले तेव्हा तक्रारदारांना शंका आल्याने त्यांनी चैन आहे का? हे पाहतांना, त्यांना चैन आढळली नाही. ते दोघेही तेथुन पळून जावू लागले. तक्रारदारांनी आरडा ओरडा केल्याने एका आरोपीतास ताब्यात घेण्यात यश आले. तर दुसरा साथीदार हा सोन्याच्या चैनसह पळुन जाण्यात यशस्वी झाला. या अनुषंगाने तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीवरुन, बोलबच्चन करुन, त्यांच्या गळयातील १२ ग्रॅमची सोन्याची चैन पेंडल सह फसवणुक करुन नेल्या संदर्भात गुरक्र.१२९/२६ कलम ३१८(४), ३(५) भा.न्या.सं.अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान पाहिजे आरोपीचे नांव नरेश उर्फ नऱ्या विजयकुमार जयस्वाल, ४० वर्षे असे असल्याचे समजले. त्याचेवर तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे यातील पाहिजे आरोपीचा मागोवा घेवुन, तो कल्याण येथे असल्याचे आढळले. कल्याण परीसरात सापळा लावुन शोध घेतला असता, नमुदचा आरोपीत इसम नरेश उर्फ नऱ्या विजयकुमार जयस्वाल, ४० वर्षे हा मिळुन आला. त्याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने अटक करण्यात आले आहे. आरोपी नरेश जयस्वाल हा एक सराईत गुन्हेगार असुन, त्याच्या विरुध्द मुंबईतील विविध पोलीस ठाण्यात मिळुन एकुण ५९ गुन्हे नोंद आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त श्री. सत्यनारायण चौधरी (कायदा व सुव्यवस्था), अप्पर पोलीस आयुक्त श्री. विक्रम देशमाने (मध्य प्रादेशिक विभाग), पोलीस उप आयुक्त श्रीमती. रागसुधा आर, परिमंडळ ०४, सहा. पोलीस आयुक्त श्री. घनश्याम पलंगे (भोईवाडा विभाग), यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक भोईवाडा पोलीस ठाणे श्री. दत्तात्रय ठाकूर, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री महाडीक, तपासी अधिकारी पोउनि.सचिन बोरसे, पो.ह.नितीन धंगेकर, पो.ह.महादेव माळी, पो.शि.हेमंत सुळे, पो.शि.संदीप भरसट यांनी सदर गुन्हा उघडकीस आणण्याकरीता गतिमान कारवाई करून उत्कृष्ठ कामगिरी केली आहे.

***